ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या अनियमितता किंवा गैरव्यवहारास सरपंच, उपसरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामपंचायत कर्मचारी जबाबदार असल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः** व्हीपीएम-२०१९/प्र.क्र. २८१/ पंरा-३

बांधकाम भवन, २५ मर्झवान पथ,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.

तारीख: १८ सप्टेंबर, २०१९

वाचा :

**शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्रमांकः** व्हीपीएम- २०१६/ प्र. क्र.२५३/पंरा-३, दि. ०४ जानेवारी, २०१७

**शासन शुद्धीपत्रक :**

उपरोक्त वाचा मधील दिनांक ०४ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या अनियमितता किंवा गैरव्यवहारास सरपंच, उपसरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामपंचायत कर्मचारी जबाबदार असल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

०२. सदर शासन परिपत्रकातील अनुक्रमांक १ येथील मजकूर

"ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता करणे अथवा ग्रामपंचायत मालमत्तेचा अथवा निधीचा अपहार करणे तसेच ग्रामपंचायतीतील मूळ दस्तऐवजामध्ये खोट्या बनावट कागदपत्रांचा समावेश करणे किंवा फेरफार करणे हा गुन्हा असल्याने त्याबाबत फौजदारी दाखल करणे क्रमप्राप्त आहे. अशा गुन्ह्याबाबत अन्य प्राधिकरणांच्या अहवालामध्ये, विभागीय चौकशीमध्ये गुन्हा घडल्याबाबत स्पष्ट निष्कर्ष काढण्यात आले असल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा."

**या ऐवजी**

"ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात **अपहार** करणे अथवा ग्रामपंचायत मालमत्तेचा अथवा निधीचा अपहार करणे तसेच ग्रामपंचायतीतील मूळ दस्तऐवजामध्ये खोट्या बनावट कागदपत्रांचा समावेश करणे किंवा फेरफार करणे हा गुन्हा असल्याने त्याबाबत फौजदारी दाखल करणे क्रमप्राप्त आहे. अशा गुन्ह्याबाबत अन्य प्राधिकरणांच्या अहवालामध्ये, विभागीय चौकशीमध्ये गुन्हा घडल्याबाबत स्पष्ट निष्कर्ष काढण्यात आले असल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा." असा वाचण्यात यावा.

०३. उर्वरित बाबी संदर्भाधीन शासन परिपत्रकातील आहे, त्याचप्रमाणेच राहतील.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८११३१३७५९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.09.18 12:52:39 +05'30'

**(असीम गुप्ता)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त, सर्व विभाग.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व).
७. सर्व सहसचिव/ उपसचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
८. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व).
९. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व).
१०. सर्व अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
११. निवडनस्ती (कार्यासन क्रमांक पंरा-३).